सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १०२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १३ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# आम्ही घरात घुसून मारू

## पळून जाण्याची संधीही देणार नाही





## मोदींचा पाकिस्तानला सज्जड दम

## जवानांचं केलं कौतुक


**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३आदमपूर -** भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांना उद्ध्वस्त करत मोठी कारवाई केली. या कारवाईनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (१३ मे) आदमपूर हवाई एअरबेसवर जाऊन भारतीय जवानांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जवानांचं कौतुक केलं. तसेच 'भारत माता की जयया घोषणेची ताकद जगाने पाहिली, जेव्हा आपल्या बहिणींचं सिंदूर हिसकावून घेतलं गेलं, तेव्हा दहशतवाद्यांच्या घरात घुसून त्यांना मारलं, असं म्हणत भारत बुद्धांची देखील धरती आणि गुरु गोविंद सिंह यांची देखील धरती आहे', असं भाष्य पंतप्रधान मोदी यांनी केलं.

भारत माता की जयया घोषणेची ताकद नुकतीच जगाने पाहिली. ही फक्त घोषणा नाही, तर देशातील प्रत्येक जवानांची एक शपथ आहे. जे जवान भारत मातेच्या सन्मान आणि प्रतिष्ठेसाठी जीवाची बाजी लावतात, त्या प्रत्येक सैनिकाची ही शपथ आहे. देशातील प्रत्येक नागरिकांचा हा आवाज आहे. भारत माता की जयहा आवाज मैदानात देखील घुमतो आणि 'मिशन'मध्ये देखील घुमतो, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

भारताचे सैनिक जेव्हा भारत माता की जय बोलतात, तेव्हा दुश्मनांचा थरकाप उडतो. जेव्हा आपलं मिसाईल निशान्यावर पोहोचतं तेव्हा दुश्मनांना देखील भारत माता की जय ही घोषणा ऐकायला जाते. जेव्हा आमची सेना न्यूक्लिअर बॉमच्या धमकीची हवा काढतात, तेव्हा आकाशापासून ते पातळापर्यंत एकच आवाज घुमतो तो म्हणजे भारत माता की जय, भारतीय जवानांनी सर्व भारतीयांची मान उंचावली आहे, असंही पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं.आज सकाळीच मी आपल्याला भेटायला आणि दर्शनासाठी आलो. जेव्हा वीरांच्या दर्शनाचा योग येतो, तेव्हा जीवन धन्य होतं. आज मी आपल्या दर्शनासाठी आलो आहे. येणाऱ्या पिढीसाठी आपले जवान प्रेरणा आहेत. मी देशातील जवानांना सलाम करतो. 'ऑपरेशन सिंदूर' हे कोणतं साध अभियान नाही, तर निर्णायक क्षमताचं त्रिवेणी आहे. भारत बुद्धांची देखील धरती आहे आणि गुरु गोविंद सिंह यांची देखील धरती आहे. गुरु गोविंद सिंहजी यांनी म्हटलं होतं की, सवा लाख से एक लड़ाऊं, चिड़ियन ते मैं बाज तुड़ाऊं, तबै गुरु गोबिंद सिंह नाम कहाऊं, आपल्या धर्माच्या रक्षणासाठी शस्त्र उचलणं ही आपली परंपरा आहे. जेव्हा आपल्या बहिणी आणि मुलींचं सिंदूर हिसकावून घेतलं गेलं, तेव्हा आपण दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून त्यांचे पंख छाटले, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं.

# एक वर्षाच्या चिमुकल्याला सोडून आई सीमेवर

## अमरावतीच्या बीएसएफ जवान रेश्मा इंगळे म्हणाल्या..



### देशासाठी कर्तव्य बजावण्याची हीच वेळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या संघर्षात शस्त्रविराम झाला असला तरीही जवळपास सगळ्याच सैनिकांना सुट्टीवरुन परत बोलवण्यात येत आहेत. महाराष्ट्रातल्या अमरावती येथील अचलपूरच्या जवान रेश्मा इंगळे यांनाही सुट्टी रद्द करुन अमृतसरला बोलवण्यात आलं आहे. त्या एक वर्षाच्या त्यांच्या मुलाला घरी ठेवून सीमेवर गेल्या आहेत. मुलाला निरोप देताना त्यांच्या डोळ्यांत पाणी आलं होतं. मात्र त्यांच्या या निर्णयाचं त्यांच्या कुटुंबाने आणि अचलपूरच्या लोकांनी कौतुक केलं आहे. त्यांचे पती भारत इंगळे यांनी आपण आता नोकरी सोडणार असून मुलाचा सांभाळ करु असं सांगितलं आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धजन्य परिस्थितीमुळे आम्हाला फोन आले आहेत की तुमची सुट्टी रद्द करण्यात आली आहे आणि तुम्हाला परत यायचं आहे. बाळाला बरोबर नेणं शक्य नाही, कारण तशी परिस्थिती नाही. त्यामुळे मी एक वर्षाच्या मुलाला ठेवून निघाले आहे. सीमा सुरक्षा दल अर्थात बीएसएफमध्ये रेश्मा इंगळे कार्यरत आहेत.

रेश्मा इंगळे म्हणाल्या की मी इडक्र मध्ये १२ वर्षांपासून आहे. आधी मी भुज आणि कच्छला होते. आता अमृतसर या ठिकाणी माझं पोस्टिंग आहे. माझं बाळ एक वर्षाचं आहे. तिथली परिस्थिती पाहता बाळाला नेता येणार नाही. त्यामुळे मी त्याला सोडून कर्तव्यावर जाते आहे. शस्त्रविराम झाला असूनही पाकिस्तानकडून काही कुरापती सुरु आहेत. त्यामुळे आम्हाला सुट्टी रद्द करुन बोलवलं आहे. पाकिस्तान जे करतो आहे त्यांना उत्तर देणं आवश्यक आहे. बाळाला घरी सोडून जाताना मला वाईट होतं आहे. पण परिस्थितीच तशी आली आहे. आम्ही सगळ्या सैनिकांनी जो गणवेश घालतो त्यासाठीचं कर्तव्य बजावण्याची वेळ हीच आहे. मला वाईट वाटतं आहे ते बाळासाठी पण माझ्या देशासाठी मी चालले आहे याचा अभिमानही आहे असंही रेश्मा इंगळे यांनी सांगितलं.

माझ्या पत्नीला मला प्रचंड अभिमान आहे. मी माझी नोकरी सोडून आता बाळाला सांभाळण्यासाठी थांबतो आहे. आम्हाला रेश्माचा अभिमान आहे कारण ती देशसेवेसाठी जाते आहे. असं रेश्मा यांचे पती भारत यांनी म्हटलं आहे. एबीपी माझाशी त्यांनी हा संवाद साधला. अमरावती येथील अचलपूर या ठिकाणी रेश्मा इंगळे राहतात. त्यांना त्यांच्या एक वर्षाच्या मुलाला घरी ठेवून अमृतसरला जावं लागलं आहे.

# असदुद्दीन ओवेसींनी थेट पाकिस्तानच्या पंतप्रधान अन् लष्करप्रमुखांना डिवचलं

## चीनवरही साधला निशाणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नवी दिल्ली**

पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील रहीम यार खान एअरबेसवर भारताने लष्करी हल्ला केल्यानंतर एअरबेसवरील एकमेव धावपट्टी एका आठवड्यासाठी बंद करण्यात आली आहे. भारताने केलेल्या हवाई हल्ल्यामुळे ही धावपट्टी उद्ध्वस्त झाली. यावरूनच एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे.



पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख असीम मुनीर हे त्यांचे भाडेतत्त्वावरील चिनी विमान रहीम यार खान एअरबेसवर उतरवू शकतील का? असा उपहासात्मक टोला त्यांनी एक्स पोस्टद्वारे लगावला आहे. या विधानात एआयएमआयएम प्रमुखांनी चीनवरही निशाणा साधला आहे.

ऑपरेशन सिंदूर नंतर, पाकिस्तानने ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी भारतावर अनेक वेळा हल्ला केला, ज्याला भारतीय सैन्याने योग्य प्रत्युत्तर दिले. भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या काळात चीनने पाकिस्तानला पाठिंबा दिला आहे. चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी शनिवारी (१० मे २००५) सांगितले की त्यांचा देश पाकिस्तानचे सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य राखण्यासाठी पाकिस्तानबरोबर उभा राहील. त्यावरून ओवेसी यांनी एकाच पोस्टमधून दोन्ही देशांना निशाणा साधला आहे.


# 'ऑपरेशन सिंदूर'चे फोटो,व्हिडीओ डाऊनलोड करणे पडू शकते महागात

## पाकिस्तान भारताविरुद्ध सायबर युद्ध छेडण्याचा प्रयत्न करू शकतो - सायबरतज्ज्ञांकडून इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३पुणे -:**भारत-पाकिस्तान यांच्यात निर्माण झालेल्या संघर्षात दोन्ही देशांनी शस्त्रसंधी स्वीकारली असली तरी पाकिस्तानच्या 'नापाक' इराद्यांबद्दल सांगता येत नाही. सध्या भारत-पाकिस्तान मधल्या संघर्षाची स्थिती काय आहे? 'ऑपरेशन सिंदूर' काय आहे? हे जाणून घेण्यासाठी भारतातील नेटिझन्स हल्ल्यांचे फोटो, व्हिडीओ, डाऊनलोड करून बघत असून, सोशल मीडियावरढरीझीलहश.शुश, डान्स ऑफ द हिलरी.शुश आणि ऑपरेशन सिंदूर इनसाइट्स.पीडीएफ अशा काही पेलोड्सदेखील शेअर झाल्या आहेत.

पण अशा पेलोड्स उघडल्या तर तुमच्या मोबाइल किंवा लॅपटॉप्समधील डेटा हॅक होऊ शकतो. या माध्यमातून पाकिस्तान भारताविरुद्ध सायबर युद्ध छेडण्याचा प्रयत्न करू शकतो, असा इशारा सायबरतज्ज्ञांकडून देण्यात आला आहे.

पेलोड कायदेशीर फायलींच्या नावाखाली प्रसारित केला जात असल्याचे वृत्त आहे, विशेषतः व्हिडीओ किंवा कागदपत्रे. या फायली वारंवार Aexe एक्सटेंशनसह येतात (उदा., tasksche.exe) आणि पहिल्या दृष्टिक्षेपात निरुपद्रवी दिसतात. एकदा क्लिक केल्यानंतर, ते डिव्हाइसवर कोड स्थापित करू शकतात, ज्यामुळे रिमोट क्सेस आणि डेटा चोरी होऊ शकतो.




**पेलोड काय करू शकते ?**

- बँकिंग क्रेडेन्शियल्स आणि पासवर्डसह संवेदनशील वैयक्तिक डेटा काढणे.

- सिस्टम फाइल्समध्ये अनधिकृत प्रवेश मिळवणे.

- संक्रमित डिव्हाइसेसचे रिमोट कंट्रोल सक्षम करणे.

सुरक्षिततेचे उपाय

- सेटिंग्ज- स्टोरेज- मीडिया ऑटो डाऊनलोड; ऑटो मीडिया डाऊनलोड बंद करावे.

- मजबूत पासवर्ड वापरावे.

-मल्टी फॅक्टर सत्यापन चालू करावे.

- संशयास्पद लिंक्सवर क्लिक करू नये.

- तुमच्या महत्त्वाच्या फाइल्सचा बॅकअप घ्यावे.

- केवळ अधिकृत आणि परवानाकृत सॉफ्टवेअर वापरावे.

# आनंदाची बातमी! वेळेआधीच मान्सून दाखल होणार?

## महाराष्ट्रातही वेळेआधीच मान्सून दाखल होणार असल्याचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

देशभरातील शेतकरी मान्सूनची आतुरतेने वाट पाहत असतात. मान्सूनच्या अंदाजावर शेतकरी शेतीची तयारी करत असतात. दरम्यान, या वर्षी जास्त पाऊस होणार असल्याचे काही तज्ज्ञांनी सांगितले होते. हवामान झपाट्याने बदलत आहे. दरम्यान, हवामान खात्याने मान्सूनबाबतची नवीनतम अपडेट दिली आहे.

नैऋत्य मान्सून मंगळवारी म्हणजेच आज दक्षिण बंगालच्या उपसागरात, दक्षिण अंदमान समुद्रात, निकोबार बेटे आणि उत्तर अंदमान समुद्राच्या काही भागात पोहोचला आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या दोन दिवसांत निकोबार बेटांवर मध्यम ते मुसळधार पाऊस पडला. पुढील तीन ते चार दिवसांत दक्षिण अरबी समुद्र, मालदीव आणि कोमोरिन क्षेत्र, दक्षिण बंगाल उपसागराचा बहुतेक भाग, अंदमान आणि निकोबार बेटे, उर्वरित अंदमान




समुद्र आणि मध्य बंगाल उपसागराच्या काही भागात मान्सूनच्या पुढील प्रगतीसाठी परिस्थिती अनुकूल आहे.महाराष्ट्रातही वेळेआधीच मान्सून दाखल होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. २७ मे रोजी केरळमध्ये मान्सून दाखल होईल आणि महाराष्ट्रात मान्सून ६ जूनच्या आसपास मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे.दक्षिण बंगालचा उपसागर, निकोबार बेटे आणि अंदमान समुद्रावर पश्चिमेकडील वाऱ्यांचा प्रभाव वाढला आहे. समुद्रसपाटीपासून १/५ किलोमीटर अंतरावर वाऱ्याचा वेग २० नॉट्सपेक्षा जास्त झाला आहे आणि काही भागात तो ४.५ नॉट्सपर्यंत वाढला आहे.

प्रदेशात आउटगोइंग लाँगवेव्ह रेडिएशन देखील कमी झाले आहे, हे ढगाळ हवामानाचे संकेत आहेत. जड्ठ हे पृथ्वीवरून अवकाशात पसरणाऱ्या ऊर्जेचे मोजमाप आहे, हे जास्त तरंगलांबींवर ते पृथ्वीच्या पृष्ठभागावरून आणि वातावरणातून उत्सर्जित होते. या परिस्थितीमुळे या प्रदेशात मान्सूनचे आगमन झाल्याचे संकेत मिळत आहेत, असं हवामान विभागाने म्हटले आहे.

# लग्नाच्या एक दिवस आधी नेत्याचा मुलगा बेपत्ता

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३अमरावती-** अमरावतीमध्ये लग्नाच्या एक दिवस आधी काँग्रेस नेत्याचा मुलगा बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी काँग्रेसचे नेते आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड यांनी पोलिसात तक्रार दाखल केली असून सध्या मुलाचा शोध सुरु आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, अमरावती जिल्ह्यातील काँग्रेस नेते आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड यांचा मुलगा वैभव मोहोड या बेपत्ता झाल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. महत्त्वाचे म्हणजे वैभव मोहोड याचा बुधवारी (१४, मे) विवाहसोहळा संपन्न होणार होता. त्याआधीच तो बेपत्ता झाल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.वैभव मोहोड हा शिवाजी महाविद्यालयात लिपिक म्हणून कार्यरत आहे. उद्या त्यांचा लग्नसोहळा पार पडणार असून लग्नाची जय्यत तयारीही करण्यात आली आहे. त्याआधीच आज आज सकाळी सामान आणायला बाहेर जातो असं सांगून वैभव घराबाहेर पडला. मात्र बराच वेळ घरी परत न आल्याने वडिलांकडून पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे बेपत्ता झालेल्या वैभव याने सकाळीच एटीएममधून ४० हजार रुपय काढल्याची माहितीही समोर आली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास फ्रेजरपुरा पोलीस करत आहेत.

## संपादकीय ......

# चुकीला माफी नाही!

पहलगामच्या भ्याड हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेद्वारे पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करत पाकिस्तानला सडेतोड उत्तर दिले. ८ मे पासून भारत-पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या या युद्धाचा शेवट कधी आणि कसा होणार, हे कोणालाही सांगता येत नव्हते. मात्र, पाकच्या लोटांगणामुळे शस्त्रसंधीची घोषणा झाली. भारताने युद्धाच्या सर्व नियमांचे पालन करूनच आवश्यक तेवढी कारवाई केली आणि त्याची माहिती पारदर्शकपणे जगाला दिली. याउलट पाकिस्तानने भारताच्या विमानतळांना व नागरी वस्त्यांना लक्ष्य बनवण्याचा नीचपणा केला. तथाकथित लष्करी यशाच्या खोटारड्या कथा जगाला सांगितल्या. नियंत्रणरेषेलगत तुफान गोळीबार करून सीमेलगत राहणार्या रहिवाशांना लक्ष्य बनवले.

जम्मू, पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजरात या राज्यांतील भागांवर ड्रोन व क्षेपणास्त्रांचे हल्ले केल्यानंतर भारताने त्यास सडेतोड प्रत्युत्तर दिले. त्यामध्ये रावळपिंडीसह पाकिस्तानचे ८ हवाई तळ उद्ध्वस्त करण्यात आले. पाकिस्तानला कायमचा धडा शिकवा, अशी भावना तमाम भारतवासीय व्यक्त करत होते. पाकिस्तानचे चार तुकडे करा, आरपार की लढाई करा, असे सल्ले निवृत्त लष्करी अधिकारी व युद्धतज्ज्ञ भारत सरकारला देत होते. पण युद्धाची जबर किंमत शेवटी सामान्यजनांनाच चुकवावी लागते. पाकिस्तानने केलेल्या तोफगोळ्यांच्या वर्षावात राजौरीचे अतिरिक्त जिल्हा विकास आयुक्त राजकुमार थापा यांचा मृत्यू झाला. जम्मू-काश्मीरमध्ये घराचे व इमारतींचे लक्षणीय नुकसान झाले. यासंबंधीची माहिती मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी दिली आहे. मात्र या युद्धात भारताने अनेक पाकिस्तानी प्रमुख दहशतवाद्यांचा खात्मा केला.

उभय देशांतील तणाव तीव्र होण्याची चिन्हे दिसत असतानाच भारत व पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी झाल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाजमाध्यमांवरून केली. वास्तविक याबाबत पडद्यामागे उभय देशांशी अमेरिका बोलणी करत होती. आज संयुक्त राष्ट्रसंघ तितकासा प्रभावी राहिला नसल्यामुळे जागतिक महासत्ता म्हणून अमेरिकेच्या भूमिकेस विशेष स्थान आहे. दक्षिण आशियात शांतता नांदावी यासाठी अमेरिकेने प्रयत्न केले असल्यास त्यात कोणतीही गैर गोष्ट नाही. पण भारत व पाकिस्तान यांच्यातील वाटाघाटीसाठी थेटपणे तिसर्या मध्यस्थाची गरज नाही ही भारताची भूमिका असून, ती योग्यच आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रम्प यांचा मध्यस्थीचा प्रस्ताव स्पष्टपणे फेटाळलाही आहे. १९७२ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या सिमला करारानुसार, आपसांतील प्रश्न उभयपक्षी चर्चा करूनच सोडवण्याचे ठरवण्यात आले होते. त्यामुळे अमेरिकेच्या या हस्तक्षेपास आक्षेप घ्यावाच लागेल. शस्त्रसंधीची घोषणा करताना भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी, पत्रकार परिषदेत अमेरिकेचा उल्लेख केला नाही, हे योग्यच झाले. उलट पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाझ शरीफ यांनी मात्र मध्यस्थीबद्दल अमेरिकेचे आभार मानले आहेत! अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर उभय देशांनी तातडीने शस्त्रसंधीचा प्रस्ताव मान्य केला, अशी माहिती देऊन ट्रम्प यांनी सर्व गोष्टीचे श्रेय स्वतःकडे घेतले आहे. पुलवामा, बालाकोट घटनांमुळे भारत-पाकिस्तान वाद टिपेला पोहोचला असताना अमेरिकेनेच हस्तक्षेप केला होता.

आता भारताने शस्त्रसंधीस सहमती दर्शवली असली, तरी उद्या पाकिस्तानने आगळीक केल्यास भारताची संरक्षण दले दणका देण्यासाठी सज्ज आहेत, असे कमोडोर रघू नायर यांनी स्पष्ट केले आहे. यापुढे दहशतवादी कारवाई केल्यास ती युद्धाचीच कृती समजली जाईल, असा आक्रमक धोरणात्मक पवित्रा भारताने स्वीकारत 'ऑपरेशन सिंदूर' सुरूच राहणार असल्याचे म्हटले आहे. तसेच शस्त्रसंधी झाली असली, तरी सिंधू जल करार स्थगितच ठेवलेला आहे. पाकिस्तानवर कोणत्याही प्रकारे विश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती नाही. शस्त्रसंधीची घोषणा केल्यानंतरही जम्मूच्या आखनूर सेक्टरमध्ये पाकिस्तानकडून तोफांचा मारा व गोळीबार करण्यात आला.

१९६२ मध्ये भारतावर आक्रमण केल्यामुळे भारत-चीन संबंध बिघडले होते. त्याचा लाभ उठवत पाकिस्तानने १९६३ मध्ये चीनबरोबर मैत्री करार करून, काश्मीरच्या ईशान्येकडील सिक्यांग सीमेलगतचा प्रदेश चीनला देऊन टाकला. त्या बदल्यात चीनने पाकिस्तानला लष्करी सहकार्याचे आश्वासन दिले. अशाप्रकारे भारताच्या विरोधात पाकिस्तानने मोर्चेबांधणी सुरू केली. १९६५ च्या युद्धात संघर्ष थांबवून लवादामार्फत सीमाप्रश्न सोडवावा, असे उभय देशांत ठरले. परंतु त्यानंतर चार महिन्यांतच पुन्हा अतिरेक्यांचे गट काश्मीर खोर्यात घुसवून, काश्मीरमध्ये सशस्त्र उठाव करण्याचा प्रयत्न केला. मात्र स्थानिक काश्मिरी जनतेनेच भारतीय सैन्याला या कटाची माहिती करून दिली आणि तो उधळून लावला.

२० ऑक्टोबर १९६५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाचे अध्यक्ष ऊ थांट यांनी भारत व पाकिस्तानच्या नेतृत्वाकडून युद्धबंदीला मान्यता मिळवली. परंतु त्यानंतरही पाकने शस्त्रसंधी कराराचे असंख्यवेळा उल्लंघन केले. फेब्रुवारी १९९९ मध्ये भारताने दिल्ली-लाहोर बस सुरू करून, त्याचप्रमाणे लाहोर करार करून उभय देशांच्या शांततामय सहजीवनाच्या दिशेने पुढचे पाऊल टाकले होते. परंतु एकीकडे हा करार होत असताना दुसरीकडे कारगिलमध्ये पाकिस्तानची पद्धतशीर घुसखोरी चालली होती. त्यावेळी कारगिल, द्रास, मुश्कोह खोरे, बटालिक काकसर, टायगर हिल या ठिकाणी तुफानी चकमकी झडल्या. भारतीय जवानांनी अतुलनीय पराक्रम केला.

अखेर सर्व बाजूंनी कोंडी झाल्यानंतर पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी स्वतःच रचलेल्या चक्रव्यूहातून सुटण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिटंन यांना साकडे घातले. तुमचे सैन्य माघारी बोलवा, असा आदेश क्लिटंन यांनी त्यांना दिला आणि तो पाकिस्तानला पाळावा लागला. आता आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला १.३ अब्ज डॉलर्सचा कर्जाचा हप्ता मंजूर केला आहे. वास्तविक या प्रस्तावास भारताने विरोध केला होता. या निधीचा वापर करून पाकिस्तान पुन्हा एकदा दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देण्याची शक्यता आहे. युद्ध थांबले नसते तर पाकिस्तानचा सर्वनाश झाला असता.

# अनुदानावर गाय, म्हैस हवीय; केव्हापर्यंत करायचा अर्ज ?

## सुशिक्षित बेरोजगार युवकांसह पशुपालक, शेतकऱ्यांसाठी योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**



ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार युवकांसह पशुपालक आणि शेतकऱ्यांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून वैयक्तिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात. गाय, म्हैस, शेळी-मेंढी गट आणि कुक्कुट पालनासाठी निवारा शेडसाठी अनुदान दिले जाते. या योजनांचा लाभ घेण्यासाठी २ जूनपर्यंत अर्ज करावा लागणार आहे.शासनाने पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत २०२१-२२ पासून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविणे सुरू केले आहे. यातून लाभार्थ्यांची निवड केली जाते. अर्जदारास दरवर्षी नव्याने अर्ज करावा लागू नये, यासाठी पाच वर्षापर्यंत प्रतीक्षा यादी लागू केली आहे. त्यामुळे अर्जदारांना लाभ मिळण्याची शक्यता वाढली आहे.संकेतस्थळावर आणि स्मार्ट फोनवरून २ जूनपर्यंत अनुदानासाठी अर्ज करता येणार आहे. अधिक माहितीसाठी १९६२ या क्रमांकावर पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### कागदपत्रे काय लागतात ?

सातबारा, ८ अ उतारा, अपत्य दाखला, स्वयंघोषणा पत्र, आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, बैंक खाते पासबुक सत्यपत्र, रेशनकार्ड, कुटुंब प्रमाणपत्र एकाच कुटुंबातील एकाच व्यक्तीला लाभ घेता येईल. अनुसूचित जाती, जमाती असल्यास जातीच्या दाखल्याची सत्यप्रत आदी कागदपत्रे लागतात.

७५ टक्क्यांपर्यंत अनुदानराज्य आणि जिल्हास्तरीय योजनेतून दुधाळ गायी-म्हशींचे गट, शेळी-मेंढी गट वाटप करणे, एक हजार मांसल कुक्कुट पक्ष्यांच्या संगोपनासाठी निवारा शेडकरिता अर्थसाहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप, तलंगा गट वाटप योजनेसाठी निवड प्रक्रिया राबवली जाणार आहे. संबंधित लाभार्थ्यांला दुधाळ जनावरांसाठी ७५ टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाते. सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५० टक्के अनुदान आहे.-




# अर्ध्या रात्रीपर्यंत टीव्ही, मोबाइल बघत बसता? डॉक्टर सांगतात 'या' ४ गोष्टींचा वाढू शकतो धोका!

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

झोपेणं ही एक नॅचरल प्रोसेस आहे. सामान्यपणे रात्री सगळेच लोक झोपतात तर काही लोक दुपारी सुद्धा झोपतात. एक्सपर्ट नेहमीच साधारण ७ ते ८ तासांची झोप घेण्याचा सल्ला देत असतात. पण आता वेळ अशी आली आहे की, हेल्थ एक्सपर्ट्स झोपण्यासंबंधी सुद्धा सल्ला देऊ लागले आहेत. कारण लोकांची लाइफस्टाईल खूप बदलली आहे. ज्यामुळे झोप प्रभावित झाली आहे म्हणा की, झोपेची वेळ कमी झाली आहे असं म्हणा. जास्त वेळ जागणं जास्तीत जास्त लोकांचं डेली रूटीन बनलं आहे.

जे लोक कॉलेजमध्ये आहेत किंवा ज्यांना जास्त वेळ काम करावं लागतं ते अर्धी झोप घेऊनच जीवन जगत असतात. झोपेची ही बिघडती सायकल पाहून एक्सपर्ट नेहमीच लोकांना झोपेचं महत्व सांगत असतात. पण तरीही लोक याकडे दुर्लक्ष करतात.

अनेक शोधांमधून झोपेच्या खराब क्वालिटीचे दुष्परिणाम आणि पुरेशा झोपेतचे फायदे याबाबत सांगण्यात आलं आहे. अलिकडेच एका अमेरिकन डॉक्टरांनी त्यांच्या सोशल मीडिया पोस्टमध्ये आपणं अर्ध्या रात्रीपर्यंत जागण्याचे आपल्या मेंदुवर काय परिणाम होतात याबाबत माहिती दिली आहे. तेच जाणून घेऊया.भारतीय वंशाचे अमेरिकन डॉक्टर सौरभ सेठी यांनी सोशल मीडिया याबाबत एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. ज्यात त्यांनी सांगितलं की, जर तुम्ही नेहमीच अर्ध्या रात्रीपर्यंत जागरण करत असाल तर तुम्हाला शारीरिक आणि मानसिक आरोग्यासंबंधी समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

रात्री उशीरापर्यंत जागण्याचे दुष्परिणाम

**वजन वाढतं**

डॉक्टरांनुसार, जर तुम्ही रोज रात्री उशीरापर्यंत जागत असाल तर तुमचं वजन वाढण्याचा अधिक धोका असतो. कारण रात्री जागल्यानं भूक वाढते. सोबतच हार्मोन्सही असंतुलित होतात. ज्यामुळे तुमचं वजन अधिक वाढतं.

**मूडवर पडतो प्रभाव**

जर तुम्ही जास्त वेळ जागरण करत असाल आणि रोज ७ ते ८ तासांची झोप घेत नसाल तर याचा तुमच्या मूडवरही प्रभाव पडतो. तुमची चिडचिड वाढते आणि तुमच्या कामावरही याचा प्रभाव दिसून येतो.

**स्ट्रेस वाढतो**




डॉक्टर म्हणाले की, रोज रात्री उशीरापर्यंत जागण्याच्या तुमच्या सवयीमुळे तुमची स्ट्रेस लेव्हल अधिक जास्त वाढू शकते. वाढलेल्या स्ट्रेसचा तुमच्या एकंदर आरोग्यावरही प्रभाव दिसून येतो.

**विचार करण्यात समस्या**

वरील वेगवेगळ्या समस्या तर होतातच, सोबतच जर तुम्ही रोज रात्री झोपण्यास उशीर करत असाल तर तुमच विचार करण्याची क्षमता देखील कमी होते. एकाग्रता कमी होते.

**काय कराल उपाय?**

डॉक्टरांनी सल्ला दिला की, वरील वेगवेगळ्या शारीरिक आणि मानसिक समस्या टाळायच्या असतील तर अर्ध्या रात्रीपर्यंत जागू नका. टीव्ही, मोबाइल जास्त बघू नका. रोज झोपण्याची एक वेळ ठरवा आणि ती फॉलो करा. यानं तुमचं एकंदर आरोग्य चांगलं राहण्यास मदत मिळेल. महत्वाची बाब म्हणजे रोज किमान ७ ते ८ तासांची झोप घ्या.

# यंदा खते घेताना घ्या 'ही' काळजी; बोगस बियाण्यांपासून सावधगिरी फायद्याची

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

यंदा मान्सून लवकर येण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविल्याने राज्यभरातील शेतकरी पेरणीपूर्व मशागत आणि बी-बियाण्यांची जुळवाजुळव करण्याच्या तयारीला लागले आहेत.दरवर्षी बियाणे व खतांच्या टंचाईचा आणि बोगस मालाचा अनुभव घेतलेल्या शेतकऱ्यांनी यंदा सुरुवातीपासूनच सजग राहणे आवश्यक आहे. पेरणीच्या ऐन वेळेस बियाणे मिळणे कठीण होते.

कृत्रिम टंचाई भासवून जादा दराने खते आणि बियाण्यांची विक्री केली जाते. त्यामुळे अनेक शेतकरी पेरणीपूर्वीच बियाणे, खते खरेदी करण्यावर भर देतात. त्यामुळे आताच योग्य त्या उपाययोजना करणे महत्त्वाचे ठरणार आहे.शेतकऱ्यांनी कोणतेही बियाणे किंवा खते घेताना पुरावा म्हणून बिल घ्यावे. अशा प्रकारे कागदपत्र असतील, तर बोगस माल आढळल्यास शासन, कंपनीकडून नुकसान भरपाईची प्रक्रिया सुलभ होते.

**बोगस बियाणे घेणे टाळण्यासाठी काय कराल?**

बऱ्याच वेळा स्थानिक बाजारात स्वस्त दरात बियाणे देण्याचे आमिष दाखवले जाते. अशावेळी अनधिकृत विक्रेत्यांकडून बियाणे घेणे टाळा.

त्यापेक्षा नोंदणीकृत, सरकारी अथवा सहकारी संस्था, जिल्हा बियाणे महामंडळाच्या विक्री केंद्रांवरून खरेदी केल्यास भरवसा राहतो, तसेच ओळखीच्या दुकानात आवश्यक बियाणे, खते खरेदी करण्यास प्राधान्य द्यावे.

**बियाणे खरेदी करताना**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

**लक्षात ठेवा...**

परवाना असलेल्या कृषी सेवा केंद्रातूनच खरेदी करा. दुकानदाराचा परवाना व विक्री नोंदणी तपासा. सरकारी दर्जेदार बियाण्यांना प्राधान्य द्या. महाबीज, नाफेड, सिडको, कृषी विद्यापीठांची बियाणी विश्वसनीय असतात.

बियाण्याच्या पिशवीवरील माहिती वाचा. जसे की बियाण्याचा प्रकार, अंकुरणशक्ती, उत्पादन वर्ष, कालबाह्यता दिनांक, लॉट क्रमांक आदी. बिल आणि रोख पावती जरूर घ्या. यामुळे बियाणे बोगस निघाले तरी नुकसान भरपाईसाठी दावा करता येतो.




**खते घेताना घ्या 'ही' काळजी-** खत नियंत्रण आदेश (ऋउज) अंतर्गत नोंदणीकृत दुकानातूनच खते खरेदी करा.


खतांच्या बॅगवर असलेली माहिती तपासा. जसे - उत्पादन दिनांक, वजन, प्रमाणपत्र क्रमांक, उत्पादकाचे नाव. खत खरेदीची पावती न विसरता घ्या. अनधिकृत विक्रेत्यांपासून सावध राहा.

# अयोध्या रेसिडेन्सीत रात्रभरात ३ घरी चोरीचा प्रयत्न

## परतवाड्यात आमदारांच्या घराशेजारी चोरट्यांचा हैदोस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३परतवाडा -**

परतवाडा ते धामणगाव गढ़ी मार्गावरील अयोध्या रेसिडेन्सी परिसरात रात्रीला चोरट्याने एका घरात चोरी केली तर दोन घरांमध्ये प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे या भागात मेळघाट विधानसभेचे आमदार केवलराम काळे यांचेही घर आहे. त्यांच्या घराच्या परिसरातच चोरट्यांनी हा हैदोस घातला. या प्रकाराने सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.अयोध्या रेसिडेन्सीतील सलग तीन घरांत चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला. त्यापैकी राजेश अलोकार यांच्या घराच्या दरवाजाचा कोंडा तोडत चोरट्यांनी आत प्रवेश करून चार हजार रुपये नगदी व देवघरातील चांदीची गपतीची मूर्ती लंपास केली. तसेच योगेश सहारे, नितेश सूर्यवंशी यांच्या घरी चोरट्यांनी प्रयत्न केला. या परिसरात सतत चोरीच्या घटना होत आहे. काही दिवसांपूर्वी याच भागात विहिरीवरील मोटरपंप, सीसीटीव्ही कॅमेरा चोरीला गेला



# मूर्तिजापुरला लाईन प्रेशरमुळे अंबा एक्सप्रेस ३ तास उशिरा आल्याने प्रवाशांचे हाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

मुंबईहून अमरावतीत दाखल होणारी अंबा एक्सप्रेस आज १२ मे रोजी तब्बल ३ तास उशिरा आल्याने प्रवाशांचे चांगलेच हाल झाले. मुर्तिजापुर येथे लाईन ॲण्ड लोड प्रेशरमुळे अंबा एक्सप्रेसला साईड ट्रॅकवर ठेवल्याने अंबा एक्सप्रेस लेट झाल्याचे समजते. परंतु, रेल्वे विभागाच्या एकाही अधिकाऱ्याने याबाबत अधिकत माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला.

माहितीनुसार, मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनलवरून रात्री ८ वाजून १० मिनिटांनी सुटणारी अंबा एक्सप्रेस (१२१११) दररोज सकाळी ७ वाजून ५५ मिनिटांनी अमरावती रेल्वेस्थानकावर दाखल होते. परंतु, आज मुर्तिजापुर रेल्वे स्थानकावर लाईन ट्रॅकवर म्हणजेलोहमार्गावर प्रेशर आल्यानेसकाळी १०.१५ वा. अमरावती रेल्वे स्थानकावर अंबा एक्सप्रेसला बराचवेळ मुर्तिजापुर रेल्वे स्थानकावर साईड ट्रॅकवर ठेवण्यात आले. त्यामुळे अंबा एक्सप्रेस तब्बल ३ तास उशिराने अमरावती रेल्वे स्थानकावर आली.

अंबा एक्सप्रेस बराचवेळ उशिरा हॉल्ट राहिल्याने सुरूवातीला काय झाले, हे प्रवाशांना समजले नाही. मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनलवरून रात्री ८ वाजून १० मिनिटांनी सुटणारी अंबा एक्सप्रेस (१२१११) दररोज सकाळी ७ वाजून ५५ मिनिटांनी अमरावती रेल्वेस्थानकावर दाखल होते.परंतु, दीड, दोन तासापेक्षा जास्त कालावधी झाल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. रेल्वे लाईनचे प्रेशर कमी झाल्यानंतर अंबा एक्सप्रेस सुरू झाल्याने प्रवाशांनी सुटकेचा त्रास सोडला. लाईन ॲण्ड लोड प्रेशरमुळे जरी मुर्तिजापुर रेल्वे स्थानकावर अंबा एक्सप्रेस लेट झाली असली तरी ट्रॅक्टर काही अडचण नसून सर्व रेल्वे जाणाऱ्या-येणाऱ्या रेल्वे सुरळित धावत असल्याचे बडनेरा रेल्वेस्थानकाचे सीसीएफ मिना यांनी सांगितले.-



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १३ मे २०२५ शहर/ग्रामिण


# शहरातील घुमंतूकांना त्यांच्या मुळगांवी रवाना करण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करा - आ. सौ. सुलभाताई खोडके



## श्याम चौक, न्यू हायस्कुल मेन शाळा परिसरात आ.सौ. सुलभा खोडके यांनी केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

अमरावती शहराला आकर्षण सौंदर्यीकरणाने एक चांगले स्वरूप व लौकिक प्राप्त होत असतांना दुसरीकडे घुमंतूकांनी मुख्य चौकांना व दर्शनी भागाला वेढा घातल्याने शहराचे सौंदर्य बाधित झाले आहे. शहरातील ऐतिहासिक धरोहर असलेल्या शाळा व इमारतीच्या ठिकाणी सुद्धा घुमंतूकांनी ठिय्या मांडला असल्याने वाहतुकीचा प्रश्न व अस्वच्छतेची समस्या सुद्धा निर्माण झाली आहे. याबाबत आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी ठोस पाऊले उचलुन

शहरातील नूतन कन्या शाळा परिसरात धडक देऊन घुमंतूकांवर कार्यवाहीला घेऊन मनपा व पोलीस प्रशासनाला स्पष्ट सूचना केल्यात.शहरातील न्यू हायस्कुल मेन शाळा व नूतन कन्या शाळेने यंदा आपले शताब्दी महोत्सवी वर्ष साजरे करीत असून संस्थेत विविध कार्यक्रम सुद्धा आयोजित केले जात आहे. मात्र त्या भागात घुमंतूक घटकांचे वाढते अतिक्रमण हे त्रासदायक ठरत असतांना वाहतूक व स्वच्छतेला घेऊन सुद्धा अडचणींचे ठरत आहे. या संदर्भात पोलीस विभाग व मनपा प्रशासनाच्या वतीने गेल्या




काळात कार्यवाह्या करण्यात आल्या. मात्र नंतर परिस्थिती जैसे -थे च असल्याने आज शहरात वाढते घुमंतूकांचे अतिक्रमण हे अनेक बाबतीत धोक्याचे ठरत आहे. यासंदर्भात जलद गतीने ठोस पाऊले उचलून थेट कार्यवाही करण्याच्या सूचना आमदार सुलभा खोडके यांनी मनपा व पोलीस प्रशासनाला दिल्यात. यावेळी आमदार खोडके यांनी स्थानिक घुमंतूकांशी संवाद साधतांना त्यांना मूळ गावी परत जाण्यास सांगितले. या संदर्भात पोलीस विभाग व मनपा प्रशासनाने घुमंतूकांना त्यांच्या मूळगांवी रवाना करण्याबाबतची कार्यवाही यथाशीघ्र करण्याची सूचना केली. शहराच्या दर्शनी भागात ठिय्या मांडून वाहतुकीला अडचण निर्माण करण्याचा प्रकार पोलिसांनी खपवून घेऊ नये, तसेच शहर जर अस्वच्छता करण्याचा प्रकार घडत असेल तर संबंधित यंत्रणेने त्यांच्यावर थेट कारवाई करण्याची सूचना आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली. शहरातील राजकमल चौक, इर्विन चौक, श्यामचौक ते तहसील मार्ग, आदी ठिकाणी असलेल्या घुमंतूकांच्या बेड्यावर सुद्धा कारवाई करून त्यांना त्यांच्या मूळ गांवी रवाना करण्यात यावे, व जर पुन्हा त्यांनी शहर विद्रुप करण्याचा प्रयत्न केल्यास कठोर पाऊले उचलण्याची सूचना सुद्धा आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी मनपा प्रशासन व पोलीस विभागाला केली. शहरातील घंटाघर परिसर , नूतन कन्या शाळा व न्यू हास्यकुल मेन शाळा हे आपल्या शहराचे जुने वैभव आहे. त्याचे जतन व संवर्धन करणे आपली जबाबदारी आहे. त्यामुळे कुणाकडूनही त्याला बाधा अथवा विद्रुपता पोहोचविण्याचा किंवा सौंदर्य लुप्त करण्याचा प्रयत्न होत असल्यास तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना आमदार सुलभा खोडके यांनी दिल्या.यावेळी मनपा उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक पोलीस आयुक्त राजापेठ भंवर , सिटी कोतवालीचे पोलीस निरीक्षक कोटनाके, मनपा जनसंपर्क अधिकारी भूषण पुसतकर,अतिक्रमण विभाग प्रमुख कोल्हे, स्वच्छता निरीक्षक कलोते, महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील आदींसह मनपा व पोलीस विभागातील कर्मचारी व शाळेचे शिक्षकवृंद उपस्थित होते.

## जलवाहिनीची लिकेज दुरुस्ती सुरू:आज सायंकाळपर्यंत काम पूर्ण होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या जलवाहिनीमध्ये झालेला तांत्रिक बिघाड दुरुस्त करण्यासाठी मजीप्रातर्फे काम हाती घेण्यात आले. स्थानिक कंत्राटद्वारामार्फतच हे काम केले जात असून सायंकाळपर्यंत लिकेजच्या ठिकाणी साचलेले पाणी बाहेर काढणे आणि लिकेजचे नेमके ठिकाण शोधणे हे दोन टप्पे पूर्ण झाले होते.

मंगळवार, १३ मे रोजी सायंकाळपर्यंत दुरुस्तीचे काम पूर्ण होणार असून, १४ मे रोजी पाणी पुरवठा पूर्ववत करण्यासाठी मजीप्राची यंत्रणा प्रयत्नरत आहे. अमरावती व बडनेरा शहराला होणारा पाणी पुरवठा मोर्शीच्या अप्पर वर्धा धरणातून केला जातो. त्यासाठी सिंभोरा ते अमरावती अशी जलवाहिनी टाकली आहे. १५०० मिमी व्यासाच्या या पीएससी जलवाहिनीला नेरपिंगळाई ते जलशुद्धीकरण केंद्रादरम्यान वडगाव माहोरे फाट्यासमोर गळती लागली आहे. त्यामुळे १२ व १३ मे रोजीचा पाणी पुरवठा बंद ठेवून तातडीने दुरुस्तीचे काम सुरू केले आहे.

यासंदर्भात मजीप्राचे उपविभागीय अभियंता संजय लेवरकर म्हणाले, रविवारी रात्रीपासूनच दुरुस्ती कार्य हाती घेण्यात आले आहे.



# ग्रीस्टॅक नोंदणी नाही, शेतकऱ्यांना जुलैपासून विजबिल येणार-पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## जिल्हा खरीप आढावा बैठकीत विविध विषयांवर चर्चाकृषी निविष्ठा लिंकिंगबाबत कंपन्यांना निर्देश देणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती-**

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणाहून देण्यासाठी ग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत नोंदणी करण्यात येत आहे. ही नोंदणी केली नसलेल्या शेतकऱ्यांना वीज बिलाची सवलत मिळणार नाही. तसेच नोंदणी क्रमांक नसणाऱ्या शेतकऱ्यांना जुलैपासून विजबिल देण्यात येणार आहे, त्यामुळे ग्रीस्टॅक अंतर्गत ३१ मे पर्यंतपूर्ण नोंदणी करावी, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी नागपूर येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे खरीप हंगामाचा आढावा घेतला. कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयातून आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर आदी उपस्थित होते.पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी खरीप हंगामात पेरणी होणाऱ्या पिकांचा आढावा घेतला. येत्यात खरीप हंगामासाठी बियाणे, खते, पीक कर्ज, सिंचन व्यवस्था आदीबाबत दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या. खरीप हंगामात कापूस आणि सोयाबीन पिक घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे. यावेळी





कापसाच्या क्षेत्रात वाढ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना बियाण्याचे कमतरता भासणार नाही, यासाठी बियाणे उत्पादक कंपनीशी सातत्यपूर्ण संपर्क ठेवावा. तसेच जिल्ह्यात बोगस बियाणे विक्री होऊ नये, यासाठी कृषी आणि महसूल या दोन्ही विभागांनी सक्रिय कारवाई करावी. यासाठी शासनस्तरावर आवश्यक असलेली मदत दिली जाईल. त्यासोबतच शेतकऱ्यांना बियाणे आणि खतांचे दर माहिती व्हावे यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत कृषी निविष्ठांचे दरपत्रक पोहोचण्यासाठी प्रयत्न करावेत. बियाणांचा दर्जा कायम राखून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येणार नाही याची दक्षता घ्यावी.कृषी निविष्ठा खरेदी करताना विक्रेत्यांतर्फे लिंकिंग करण्याचा प्रश्न सातत्याने समोर येत आहे. याबाबत कंपनीस्तरावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच विक्रेत्यांचे स्तरावर लिंकिंगचे प्रकार होऊ नये, याची काळजी घ्यावी. शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्यासाठी आतापासूनच नियोजन करण्यात यावे. राष्ट्रीय बँकांकडून करण्यात येणारी अडवणूक थांबवण्यासाठी प्रत्येक महाराजस्व अभियान आणि बँकेत कर्जवाटप मेळावा घ्यावा. मागणी करणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्यांना वेळत कर्ज देण्यात यावे. कर्ज वाटप करण्यात जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष देऊन पीक कर्ज वाटप प्रक्रिया सुरळीत करावी.खरीप हंगामात आवश्यकता पडल्यास सिंचनाची व्यवस्था करावी लागणार आहे. यासाठी सिंचन विभागाने एक महिना अगोदर नियोजन करावे. कालव्याद्वारे सक्षमपणे पाणीपुरवठा करताना या कालव्यांची दुरुस्ती तातडीने करण्यात यावी. जेणेकरून शेवटपर्यंत शेतकऱ्यांना पाणी मिळू शकेल. तसेच जंगलात राहणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांसाठी बिरसा मुंडा योजनेअंतर्गत विंधन विहीर योजना आहे. या सर्व शेतकऱ्यांचे तातडीने अर्ज घेऊन त्यांना या योजनेचा लाभ देण्यात यावा. तसेच उन्हाळ्यात चारा टंचाई जाणू नये, यासाठी चारा लागवडीचे धोरण तयार करावे. यासाठी बियाणे आणि जागा शासनातर्फे पुरविण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## कुठलेही कारण न देता.. केंद्राची आंतरजातीय विवाह योजना बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती-**

जातीय भेदभाव कमी करून सर्व धर्मांत समानता यावी, या दृष्टिकोनातून सुरू करण्यात आलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकात्मिक आंतरजातीय विवाह योजना अचानक बंद करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने २०१४-१५ पासून ही योजना सुरू होती. परंतु, कुठलेही कारण न देता ही योजना बंद करण्यात आली. विशेष म्हणजे, राज्याच्या सामाजिक न्याय विभागाकडे या योजनेसाठी अर्ज करणाऱ्यांना योजना बंद झाल्याचे थेट पत्रच दिले जात आहे.

केंद्र सरकारच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकात्मिक आंतरजातीय विवाह योजनेच्या माध्यमातून आंतरजातीय विवाह केलेल्या



दाम्पत्यास २ लाख ५० हजार रुपये इतके अर्थसहाय्य दिले जात होते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आंतरजातीय विवाहित दाम्पत्यापैकी एक व्यक्ती अनुसूचित जातीची असणे आवश्यक होते. विवाहाच्या एक वर्षाच्या आत परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे व राज्याच्या समाजकल्याण विभागाकडे अर्ज करणे आवश्यक होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या संकेतस्थळावर आजही ही योजना सुरू असल्याचे दर्शवले जाते. परंतु, पात्र अर्जदारांना समाज कल्याण विभागाकडून पत्र पाठवून ही योजना बंद झाल्याचे कळवण्यात आले आहे. तसेच सामाजिक न्याय आयुक्तालयानेही सर्व जिल्ह्यांच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांना ही योजना बंद झाल्याचे पत्र पाठवले आहे.

### 'आंतरजातीय'चे प्रमाण ५ टक्के

जात, धर्माच्या भिंती भेदून विवाह करण्याचे प्रमाण आजही कमी आहे. अनेक संस्थांच्या अहवालानुसार, भारतात हे प्रमाण केवळ ५ टक्के इतके आहे.

## रहाटगाव येथे आढळली बेशुध्द अवस्थेतील अर्धनग्न महिला !

### पोलिसांनी सामान्य रुग्णालयात केले दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती** :नांदगाव पेठ पोलिसस्टेशन अंतर्गत येणाऱ्या रहाटगाव परिसरात एक अर्धनग्न अवस्थेतील बेशुध्द पडलेली महिला आढळल्याने परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे. पोलिसांना यासंदर्भात माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी जावून महिलेला उपचारार्थ जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.

सोमवारी पहाटे ६ वाजताच्या सुमारास रहाटगाव परिसरात ३५ ते ४० वर्षे वयाची एक महिला अर्धनग्न अवस्थेत पडून होती. तिला चेतना नसल्यामुळे ती हालचाल करीत नव्हती. ही माहिती मिळताच पोलिसांचे पथकतत्काळ घटनास्थळावर पोहोचले व महिलेला जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती केले. उपचारानंतर जेव्हा महिलेला चेतना आली तेव्हा महिलेने कोणाच्याही विरोधात तक्रार दिली नाही. पोलिसांनी तिने सांगितलेल्या माहितीवरून तिच्या नातेवाईकांसोबत संपर्क केला तेव्हा कुटुंबियांनीसुध्दा तक्रार करण्यास मनाई केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनीच स्वतः तपासकार्य सुरू केले आहे. पोलिसांनी महिलेला विचारपूस केली की, या ठिकाणी अर्धवट कपडे घालून आपण कशा काय पडल्या होत्या. तेव्हा महिलेने याबाबत काहीही माहिती दिली नाही. फक्त तिने आपले नाव व पत्ता सांगितला.

# वरुड तालुक्यातील इसंब्रीत १६ मे रोजी कार्यक्रम

## अभिनेता किरण माने यांना सत्यपाल महाराज समाज प्रबोधन पुरस्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३वरुड** - समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचा १६ मे हा जन्मदिवस प्रबोधन दिन म्हणून विविध सामाजिक कार्यक्रमाने साजरा केला जातो. यंदाचा प्रबोधन दिन वरुड तालुक्यातील इसंब्री येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेच्या प्रांगणात सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळात होईल. यावेळी सुप्रसिद्ध अभिनेते तथा शिव-फुले- शाहू - आंबेडकरी विचारवंत किरण माने यांना सत्यपाल महाराज प्रबोधनकार पुरस्कार प्रदान करण्यात येईल. स्वत: सत्यपाल महाराज या वेळी उपस्थित राहतील. अभिनेते माने यांची नाळ ग्रामीण भागाशी जोडलेली आहे.सायंकाळी ६.३० वाजता मुख्य कार्यक्रमात पुरस्कार वितरण होईल. यानंतर सत्यपाल महाराज (चिंचोळकर) यांची वृक्षतुला करण्यात येईल. रात्री ९ वाजता सत्यपाल महाराज यांचे राष्ट्रीय कीर्तन होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सत्यशोधक विचारवंत डॉ. सय्यद (अहिल्यानगर) असतील. उद्घाटन अ. भा. बौद्ध भिक्खू महासंघाचे महासचिव डॉ. सत्यानंद महाथेरो यांच्या हस्ते होणार असून, खा. बळवंत वानखडे, खा. अमर काळे, आ. चंदू यावलके, आ. गजानन लवटे, ड. यशोमती ठाकूर, प्रहार संस्थापक बच्चू कडू, माजी आमदार देवेंद्र भुयार, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश अध्यक्ष सीमा बोके, किरण गायकवाड यांची उपस्थिती असेल.या कार्यक्रमाला येताना कुणीही पुष्पगुच्छ, शाल, हारतुरे आणू नये, तर फक्त एक पुस्तकाची भेट द्या, असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक पवन दवंडे यांनी केले.

## स्कूलबसच्या कार्यप्रसंगी वापराला ट्रॅव्हल्स ग्रुपचा विरोध

### प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना दिले निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मोर्शी** : शालेय विद्यार्थ्यांना ने-आण करायचेमहत्त्वाचे व जबाबदारीचे कार्य असल्यावरसुद्धा मोर्शी तालुक्यामधील शालेय बसचा अवैधरित्या कार्यप्रसंगी व सहलीकरता वापर केला जात असल्याने यावर निर्बंध घालावा, अशी मागणी मोर्शी ट्रॅव्हल्स ग्रुपतर्फे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले की, मोर्शी तालुक्यामध्ये सध्या स्कूलबसने धुमाकूळ घातला असून शाळेच्या सुटीत या गाड्या विनापरवाना सहलीला जात आहे. या गाड्या कुठल्याही नियमांचे पालन करत नाही. बैठक व्यवस्थेपेक्षा जास्त प्रवाशी नेल्या जाते. त्याचबरोबर कुठल्याही स्कूलबसला वेगानेचे बंधन दिसून येत नाही. सहलीला जाणाऱ्या गाड्याचे वार्षिक १ हजार ९०० प्रवासी प्रमाणे सरकारला कर दिल्या जातो, तर स्कूलबस १०० रु. सीट प्रमाणे कर भरणा करतात त्यामुळे सरकारला आम्ही ट्रॅव्हल मालक जास्त कर भरणा करूनसुद्धा आम्हाला या शालेय बसेस सहलीला किंवा लग्न कार्याला जात असल्याने आमच्या



गाड्या उभ्या ठेवाव्या लागतात. या गाड्याला टॅक्स कमी आणि परमिट लागत नसल्यामुळे स्कूलबसचे मालक कमी रुपयात भाडे घेऊन जातात. त्याचबरोबर आम्हा सर्व लोकांच्या गाड्या या कर्ज काढून घेतल्या आहे. सोबत शासनाचा कर दरवर्षी गाडीवर सुरू राहतो. त्यामुळे आमचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. सहल किंवा लग्नप्रसंगाकरिता जाणाऱ्या गाड्यांवर निर्बंध लावून कार्यवाही करावी, अशी मागणी मोर्शी ट्रॅव्हल्स ग्रुपद्वारे प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरावती यांच्याकडे केली आहे.निवेदन देतेवेळी वसंत ढोले, सचिन लाड, मंगेश गोहाड, संजय घोरमाडे, स्वप्नील निंभोरकर, प्रतीक दोडके, प्रतीक गोरले, पंकज बेहरे, निलेश गणथडे, विवेक देशमुख तसेच इतर ट्रॅव्हल्सचे मालक उपस्थित होते.

# वनविभागात कर्मचारीच बनले एजंट; बदल्यांसाठी होतेय लाखोंची उलाढाल

## कार्यालयात 'बाबूगिरी' : नियमित वनसंरक्षक नसल्याने कोणालाच कोणाचा नाही पायपोस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३पांढरकवडा**

वनविभागाच्यायवतमाळ वृत्तातील पांढरकवडा, पुसद, यवतमाळ व वाशिम डिव्हीजनमधील तीन वर्षे पूर्ण झालेल्या बदलीस पात्र कर्मचाऱ्यांच्या ३० टक्के मर्यादेत बदल्यांची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, याही वेळी कार्यालयातील बाबूंनी वरिष्ठांच्या परस्पर बदलीपात्र याद्यात घोळ घातला आहे. यासाठी लाखोंची उलाढाल झाल्याची चर्चा आहे.

मुख्य लेखापाल, लेखापाल, लिपिक, क्षेत्र सहायक, वनरक्षक, वन सर्वेक्षक व वाहनचालक आदी पदांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू असून ती साधारणपणे ३० मेपर्यंत संपणार आहे. यासाठी एकाच ठिकाणी तीन वर्ष पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांची यादी तयार करण्यात आली आहे. परंतु याच यादीत प्रत्येक कार्यालयामध्ये टेबलवर बसलेल्या बाबूंनी आर्थिक गोंधळ घातल्याचे समजते. यवतमाळ वनवृत्त कार्यालयातील वनसंरक्षक प्रादेशिक अधिकाऱ्याचे पद गत सहा महिन्यांपासून रिक्त आहे. वनवृत्ताचा कार्यभार प्रभारी अधिकाऱ्याकडे असल्याने नेमका याचाच गैरफायदा घेतला जात आहे. यवतमाळ वनवृत्त कार्यालयातील वनसंरक्षक वसंत घुले हे ऑक्टोबर २०२४ मध्ये सेवानिवृत्त झाले. त्यांच्या




जागी अद्यापपर्यंत अधिकाऱ्याची नियुक्ती झालेली नाही. त्यामुळे यवतमाळ वनवृत्ताचा कार्यभार अमरावतीचे क्षेत्र संचालक एम. आदर्श रेड्डी यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. नियमित 'वनसंरक्षक' नसल्याने वन विभागात सध्या कोणाचाच कोणाला पायपोस नसल्याने काही ठराविक जणांची मनमानी सुरू आहे.

यवतमाळ वनवृत्ताचा आवाका मोठा आहे. या अंतर्गत पांढरकवडा, पुसद, यवतमाळ व वाशिम डिव्हिजन येतात. बदली प्रक्रियेत काही लिपिकांच्या मनमर्जीमुळे फिल्डवरच्या पोस्टिंगचे रेट वधारले आहेत. विशेष म्हणजे या लिपिक तसेच काही अधिकाऱ्यांसाठी प्रत्येक डिव्हिजनमध्ये काही कर्मचारीच एजंटचे काम करीत असल्याचे चित्र आहे. या एजंटमार्फत टेबलवरील लोकांना हाताशी धरून सोईच्या ठिकाणी पोस्टिंग पाहिजे असल्यास लाखोंच्या घरात रक्कम देऊन पाहिजे त्या ठिकाणी बदलीची गॅरंटी दिली जात असल्याचे समजते.

काही कर्मचारी एका डिव्हिजनमध्ये १५ ते २० वर्षांपासून आहेत. परंतु जे चिरीमिरी देत नाहीत. त्यांना नियम दाखवून आऊट ऑफ डिव्हिजन पाठविण्याची तयारी आहे. तर बदलीस पात्र कर्मचाऱ्यांच्या यादीतही ज्या कर्मचाऱ्यांना जास्त काळ झाला आहे, अशांची नावे यादीमध्ये न समाविष्ट करता इतर कर्मचाऱ्यांची नावे घुसडण्यात आली आहे.

# पालकमंत्री बावनकुळेंनी गरीब महिलेला ई-रिक्षा देऊन तिच्या मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नागपूर**

पतीच्या मृत्युमुळे दहावीत असलेल्या मुलीचे शिक्षण कसे करावे आणि घर कसे चालवावे या मोठ्या पेचात सापडलेल्या गरीब महिलेने थेट महसूलमंत्र्यांचा जनता दरबार गाठला. नेत्यांच्या दरबारात खरोखरच गरीबाला न्याय मिळेल का ही तिच्या मनात शंका होतीच. मात्र, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केवळ तिची समस्याच ऐकली नाही तर २४ तासांत तिच्या हाती स्वयंरोजगाराचे साधन म्हणून ई-रिक्षाची चावी दिली. तसेच या महिलेच्या इयत्ता दहावीत शिकणाऱ्या मुलीच्या शिक्षणाची जबाबदारीदेखील स्वीकारली. राजकारणी व्यक्तीच्या आतील संवेदनशीलता पाहून महिलेला देखील गहीवरून आले.

दिपाली सावरकर असे संबंधित महिलेचे नाव आहे. त्यांचे पती मिस्त्री म्हणून काम करत होते. त्यांच्या पतीचा अपघात झाला व त्यात ते अपंग झाले. त्यांचे पोट हातावर होते व कामच सुटल्याने दोन वेळच्या जेवणाची समस्या निर्माण झाली. शासकीय मदतीतून ई-रिक्षा मिळाली तर कुटुंब व मुलीचे पालनपोषण होईल असे त्यांना वाटले. दरम्यान, पतीचे निधन झाले आणि त्यांनी नाईलाजास्तोवर मुलीला नातलगांकडे शिक्षणासाठी ठेवले. मात्र त्यांचे मन त्यांना खात होते. काहीही करून स्वतःच्या पायावर उभे राहून मुलीला शिकवायचे हा निश्चय त्यांनी उराशी बाळगला. त्यांना बावनकुळे यांच्या जनता दरबाराबाबत माहिती कळाली. ११ मे रोजी त्यांनी कोराडी येथे जाऊन बावनकुळे यांची भेट घेतली व आपबिती सांगितली. बावनकुळे त्यांची कहाणी ऐकून अस्वस्थ झाले. त्यांनी दुसऱ्या दिवशी त्यांना व मुलीला बोलविले. त्यांनी अचानक दिपाली यांच्या हाती ई-रिक्षाची चाबी दिली व ते पाहून त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. त्यांनी मुलीच्या शिक्षणाचीदेखील जबाबदारी घेत असल्याचे त्यांना सांगून आश्वस्त केले. बावनकुळे यांच्यातील संवेदनशीलता पाहून दिपाली भारावून गेल्या होत्या.

# विदर्भात दोन दिवस अवकाळीचा तडाखा बरसणार

## पाच जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट : कमाल तापमान ४ ते ७ अंशाने घसरले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नागपूर-** आठवडा भरापासून सुरू असलेले अवकाळी पावसाचे सत्र पुढचे तीन चार दिवस कायम राहणार आहे. यात १४ व १५ तारखेला वेगवान वादळ व विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस येण्याचीही शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. भंडारा, गोंदिया, गडचिरोली, वर्धा व यवतमाळ या पाच जिल्ह्यात अवकाळी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तरेकडून पश्चिमेकडे वाहणाऱ्या उष्ण वाऱ्याची दिशा बदलल्याने विदर्भात अवकाळी पावसा साठी पोषक वातावरण तयार झाले आहे. विदर्भात गेल्या सहा दिवसात काही जिल्ह्यात विजेच्या कडकडासह तुरळक आणि सामान्य पावसाची नोंद झालेली आहे. पुढील दोन दिवस विदर्भात आकाशात ढग दाटलेली असतील. मात्र, बुधवारी आणि गुरुवारी विदर्भातील काही जिल्हात जोरदार पावसाची दाट शक्यता असल्यामुळं हवामान विभागा कडून पाच जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला



आहे. इतरही जिल्ह्यात वादळी व पावसाळी वातावरण राहील, अशीच शक्यता आहे.

**पुढचे १५ दिवसही अवकाळीचा गारवा?**

दरम्यान हवामान विभागाने जारी केलेल्या नव्या अंदाजानुसार विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात यापुढे १५ ते २० दिवस म्हणजे संपूर्ण मे महिना अवकाळी पावसाच्या सावटाखाली जाण्याची शक्यता आहे. २३ ते ३१ मे पर्यंत मान्सून कधीही केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. अंदमान व आग्नेय बंगालच्या उपसागरात दाखल झालेला मान्सून चांगलाच कोसळत असुन त्याच्या पुढील वाटचालीस अनुकूल वातावरण तयार होत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही मान्सूनपूर्व अवकाळी पावसाची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पेरणीपूर्वीच्या मशागतीला वेग येण्याची शक्यता आहे.

# दहशतवाद आणि त्यांना पोसणारे आका आता वेगळे नाहीत, २६/११ च्या वेळी केलेली मागणी आता भारताची अधिकृत भूमिका - मुख्यमंत्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नागपूर : -** मुंबईवर २६/११ चा हल्ला झाला, तेव्हाच दहशतवाद आणि त्यांना पोसणारे आका अर्थात तेथील सरकार यांना वेगळे मानू नका, अशी मागणी आपण जगापुढे केली होती. पण, आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने ती आपली अधिकृत भूमिका म्हणून जाहीर केली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित केल्यानंतर नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकारांशी संवाद साधला. मुख्यमंत्री म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीन 'न्यू नॉर्मल' आज सांगितले. कुठलीही दहशतवादी कारवाई हा भारतावरचा हल्ला मानण्यात येईल आणि त्याला तितकेच ठोस उत्तर दिले जाईल. कोणतेही 'न्यूक्लिअर ब्लॅकमेल' आम्ही कदापिही सहन करणार नाही तसेच दहशतवादी आणि त्यांना पोसणारे आका म्हणजे पाकिस्तानचे सरकार यांना



वेगळे पाहणार नाही. या तिन्ही बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण, दरवेळी दहशतवादी हल्ला झाला की, पाकिस्तानचे सरकार आमचा दहशतवादाशी काही संबंध नाही, असा जगासमोर कांगावा करीत होते. पण, आता तसे होणार नाही. आज भारताने आपली भूमिका अत्यंत स्पष्टपणे जगापुढे मांडली आहे.

भारताने पंजाब प्रांतांत जाऊनही कशाप्रकारे ऑपरेशन केले, हेही पंतप्रधानांनी आज सांगितले. पाकिस्तानने घाबरुन भारताला फोन केला आणि शस्त्रसंधी मागितली, हेही त्यांनी सांगितले. भारताने ऑपरेशन सिंदूर हे किती ताकदीने, शक्तीने, संयमाने आणि अचूकतेने राबविले, हे त्यातून दिसून येते. मी भारतीय सैन्यदलाचे अतिशय मनापासून अभिनंदन करतो आणि मोदींनाही धन्यवाद देतो. आता केवळ पाकव्याप्त काश्मीरवरच चर्चा होईल, हेही पंतप्रधानांनी आपल्या संबोधनातून स्पष्ट केले आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# राज्याला अवकाळीचा तडाखा! वीज पडून अनर्थ, ६ जणांचा मृत्यू

## शहापूर, जालना, नाशिक, नेवासा, बुलढाणा जिल्ह्यांत घडल्यात घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ बुलढाणा -**

महाराष्ट्रावर पुन्हा एकदा अवकाळी पावसाचे अस्मानी संकट ओढावले आहे. पुढील तीन दिवस राज्यात अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याचा इशारा हवामान विभागाने दिलाय. सोमवारपासूनच अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस आणि वादळी वाऱ्याची सुरूवात झाली आहे. आज आणि उद्याही राज्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा अंदाज सांगितलाय. राज्यावर आलेल्या अस्मानी संकटात आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. अंगावर वीज पडून आतापर्यंत राज्यात सहा जणांचा मृत्यू झालाय. शहापूर, नाशिक, अहमदनगर आणि जालन्यामध्ये वीज पडून सहा जणांचा मृत्यू झाला आहे.

शहापूर तालुक्यात गेल्या चार-पाच दिवसांपासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडत आहे. डोळखांब परिसरातील जांभुळवाड येथील दिनेश नारायण सोगीर (वय ३०), नयन भगवान सोगीर (वय १४) आणि काळूराम सखाराम वाघ हे तिघे दुचाकीवरून घरी परतत असताना चिल्लरवाडी येथे त्यांच्यावर वीज कोसळली. यात दिनेश आणि नयन यांचा जागीच मृत्यू झाला, तर




काळूराम गंभीर जखमी झाला. जखमी काळूरामला शहापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

बुलढाण्यातील लोणार तालुक्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार अवकाळी पावसाने हजेरी लावली. यात चोरपांग्रा येथील रंजना संदीप चव्हाण (वय ३५) या महिलेच्या अंगावर शेतात काम करताना अचानक वीज कोसळली, ज्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. रंजनाच्या बाजूलाच असलेली दोन मुले सुदैवाने बचावली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे. महिलेचा मृतदेह बीबी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे.

नेवासा तालुक्यातील इमामपूर येथे काल, १२ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास ढगाळ वातावरण आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांचा कडकडाट सुरू होता. याचवेळी शेतात काम करणाऱ्या गणेश शिवाजी काळे (वय ३४) या तरुण शेतकऱ्याच्या अंगावर अचानक वीज कोसळली, ज्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे.

# एमबीबीएसच्या कोर्समध्ये आता हिमॅटोलॉजीचा समावेश करण्याची मागणी

## देशातील अनेक सिलकलसेल रूग्णांवर वेळेत उपचार मिळू शकतात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ वर्धा-** सिकलसेल रोग जन्मतःच असतो. त्यावर उपचार करण्यासाठी हिमॅटोलॉजिस्ट देशात नगण्य आहे. त्यामुळे एमबीबीएस कोर्स आणि पदव्युत्तर कोर्समध्ये हिमॅटोलॉजी कोर्स समाविष्ट करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने (गवई) केली आहे. देशाचे भविष्य बालक व बालिका सुरक्षित राहण्यासाठी सिकलसेल रोगाचा पूर्णपणे नायनाट होणे काळाची गरज आहे. त्यामुळे याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली. याबाबत रिपाइंने (गवई) यापूर्वीही पंतप्रधान आणि इतर मंत्र्यांना निवेदन दिले आहे.

सोबतच राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग यांनासुद्धा निवेदन दिले. मेडिकल कमिशन, नवी दिल्लीद्वारा पक्षाला पत्रही




प्राप्त झाले आहे, असे रिपाई (गवई) चे प्रदेश उपध्यक्ष गोकुल पांडे, जिल्हाध्यक्ष ॲड नरेंद्र पाटील, निरंजन शर्मा, ॲड. अनिल ओरके, ॲड. पुरुषोत्तम धाबर्डे, उमेश पाटील, धनराज बागेश्वर, अनिल कांबळे आदींनी कळविले आहे. हिमॅटोलॉजीचा अभ्यासक्रम एमबीबीएम कोर्स मध्ये समाविष्ट केला तर देशातील अनेक सिलकलसेल रूग्णांवर वेळेत उपचार मिळतील. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका स्तरावर अनेक डॉक्टर उपलब्ध होतील. अशा आशावाद निवेदनातून व्यक्त केला आहे.

# फ्रेजरपुरातून सव्वाचार किलो गांजा जप्त

## एकाला अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

फ्रेजरपुरा परिसरातील एका घरी गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून ४.३६० किलो गांजा जप्त केला. या प्रकरणी एकाला अटक केली. ही कारवाई सोमवारी (दि. १२) दुपारी केली. राजू सखरू मांजरे (४६, रा. फ्रेजरपुरा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. राजू मांजरे हा आपल्या राहत्या घरून गांजा विकत असल्याची माहिती फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असलेल्या गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पथकाने राजू मांजरे याच्या घरी धाड टाकून झडती घेतली. झडतीत घरात पायरीच्या खाली असलेल्या कण्यामध्ये एका प्लास्टिकच्या पोत्यात ४ किलो ३६० ग्रॅम गांजा, कागदी चिलम असलेले दोन बॉक्स आणि प्लास्टिकचे छोट्या पाउच्चे बंडल व एक मोबाइल असा एकूण १ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. हा मुद्देमाल जप्त करून राजू मांजरेला अटक केली.

# विदर्भात अमरावती विभाग अव्वल

## निकाल २.६३ टक्क्यांनी घसरला उत्तीर्णतेत मुली आघाडीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

इयत्ता दहावीच्या परीक्षेत अमरावती विभाग राज्यात सहाव्या, तर विदर्भात प्रथम स्थानावर आहे. विभागाचा सरासरी निकाल ९२.९५ टक्के लागला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत तो २.६३ टक्क्यांनी घसरला आहे. बुलढाणा जिल्हा ९५.५२ टक्के निकालासह विभागात पहिल्या क्रमांकावर आहे. मुलांपेक्षा मुली उत्तीर्ण होण्याचे प्रमाण यंदाही जास्तच आहे.

### अशी आहे जिल्हानिहाय टक्केवारी

वाशीम – ९५.४१
बुलढाणा – ९५.५२
अकोला – ८९.३५
अमरावती – ९२.८६
यवतमाळ – ९१.५१



### ४८,५३० विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत

अमरावती विभागातल्या पाचही जिल्हयांतील ४८ हजार ५३० विद्यार्थी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण घेऊन प्रावीण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. ४८ हजार ७७४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ३९ हजार ५०९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत, १० हजार ९२६ विद्यार्थी फक्त उत्तीर्ण झाले आहेत.

अमरावती विभागीय मंडळाच्या सचिव नीलिमा टाके, सहसचिव संगीता पवार यांनी मंगळवारी विभागातल्या पाचही जिल्ह्यांच्या निकालाचा तपशील प्रसार माध्यमांसमोर जाहीर केला. दहावीच्या परीक्षेसाठी अमरावती विभागातील १ लाख ५८ हजार ९३१ विद्यार्थी पात्र ठरले होते. त्यापैकी १ लाख ४७ हजार ७३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यात ७७ हजार ५२ मुले व ७९ हजार ६८७ मुली आहेत. अनुक्रमे त्यांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९०.८२ व ९५.४० टक्के आहे. वाशीम जिल्ह्याचा निकाल ९५.४१ टक्के लागला आहे. या जिल्ह्यातून १९ हजार ६९५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली; पैकी १८ हजार ७९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. बुलढाणा जिल्ह्याचा निकाल ९५.५२ टक्के लागला आहे. या जिल्ह्यातील ३८ हजार ९९६ विद्यार्थी परीक्षेसाठी पात्र होते; त्यापैकी ३७ हजार २५२ उत्तीर्ण झाले. अकोला जिल्ह्याचा निकाल ८९.३५ टक्के लागला आहे. या जिल्ह्यातून २५ हजार २२९ विद्यार्थी पात्र ठरले होते; त्यापैकी २२ हजार ५४४ उत्तीर्ण झाले. अमरावती जिल्ह्याचा निकाल ९२.८६ टक्के लागला आहे.दहावीच्या परीक्षेतया जिल्ह्यातून ३७ हजार १९१ विद्यार्थी पात्र होते, ३४ हजार ५३९ उत्तीर्ण झाले.

## भाजपाने भाकरी फिरवली ;अमरावती जिल्ह्यात भाजपाचे तीन अध्यक्ष

# डॉ. नितीन धांडे,रविराज देशमुख, प्रभुदास भिलावेकर,यांची निवड





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**–मरावती जिल्ह्यात भाजपाने तीन अध्यक्ष दिले आहे. आतापर्यंत अमरावती ग्रामीण व शहर जिल्हाध्यक्ष अशी दोन पदे होती. आता भाजपादृष्ट्या मेळघाट हा नवीन जिल्हा करण्यात आला आहे.शहर आणि ग्रामीण च्या अध्यक्षांचे नवनीत राणा यांनी पुष्पगुच्छ देत स्वागत केले.

अमरावती ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी रविराज देशमुख यांची तर मेळघाट भाजपा जिल्हाध्यक्षपदी माजी आमदार प्रभुदास भिलावेकर आणि अमरावती शहर जिल्हाध्यक्षपदी डॉ. नितीन धांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तिवसा, मोर्शी, धामणगाव रेल्वे, बडनेरा ग्रामीण अशा साडेतीन विधानसभा क्षेत्रासाठी रविराज देशमुख हे जिल्हाध्यक्ष असतील तर मेळघाट, अचलपूर, दर्यापूर या तीन विधानसभा मतदारसंघासाठी प्रभुदास भिलावेकर हे जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळतील. अमरावती विधानसभा व बडनेरा मतदारसंघातील शहरी भाग अशा दीड विधानसभा क्षेत्राचे अमरावती शहर जिल्हाध्यक्ष म्हणून डॉ. नितीन धांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसापासून जिल्हाध्यक्ष पदांच्या नावाची चर्चा सुरू होती अनेक नावे चर्चेला आली होती अखेर नावे जाहीर झाल्याने चर्चेला पूर्णविराम लागला आहे. नावे जाहीर होताच अनेकांची निराशा झाल्याचे पाहायला मिळाले.






IBPS मार्फत घेण्यात आलेल्या महापारेषण विद्युत सहाय्यक पदी ब्राह्मणवाडा गोविंदपुर येथील विद्यार्थ्यांनी कु. कृषिका किशोर गोंडाणे ची निवड झाल्याबद्दल तसेच रजत राजेंद्र भुयार यांची ENFORCEMENT DIRECTOR-TE ( ED ) या विभागात निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती चे सभापती श्री.हरिष मोरे यांच्या हस्ते करण्यात आला तसेच त्यांना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रशांत भुयार मा. पं. स. सदस्य, मनिष भुयार,किशोर गोंडाणे, मनिष धुर्वे, भीमराव बनसोड, आदित्य भुयार, राहुल जिचकार, सुनील मेश्राम उपस्थित होते.

# ‘ते एवढ्या मोठ्या पदावर जातील असं वाटलं नव्हतं’

## सरन्यायाधीशपदी विराजमान होणाऱ्या सुपुत्राविषयी कमलताई गवई भावूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती :**

ते एवढ्या मोठ्या पदावर जातील असं कधी वाटलं नव्हतं, असं म्हणत न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या मातोश्री डॉ. कमलताई गवई यांनी भावूक प्रतिक्रिया दिली. भूषण गवई हे उद्या १४ मे रोजी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेणार आहेत. अमरावती सारख्या जिल्ह्यातून सर्वोच्च न्यायालयाच्या सर्वोच्च पदावर पोहोचलेला मुलगा पाहताना एका आईच्या मनात असलेली नम्रता आणि आनंद दोन्ही शब्दांतून व्यक्त झाले.

दैनिक विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना कमलताई गवई म्हणाल्या की भूषणने त्याचे वडील रा. सू. गवई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावलावर पाऊल टाकून समाजाभिमुख काम करावं, ही एक आई म्हणून आणि एक सामान्य स्त्री म्हणून माझी अपेक्षा आहे. त्यांनी स्पष्ट केलं की, न्याय देताना भूषणने कोण मोठं, कोण लहान हे न पाहता सर्वांशी समान वागणूक ठेवावी, लोकांच्या हितासाठी काम करावं, अशी त्यांची मनस्वी इच्छा आहे.

लोकाभिमुख राहून न्याय द्यावा, लोकांच्या हक्कांची जपणूक करावी, हेच मी त्याच्याकडून अपेक्षित ठेवते, असंही त्या म्हणाल्या. भूषण गवई हे साधेपणाने जगणारे, सर्वसामान्यांशी सहज संवाद साधणारे व्यक्तिमत्त्व असून, न्यायव्यवस्थेतील त्यांचा प्रवास ही तर प्रेरणादायी कहाणी आहे.



शपथविधी सोहळ्यासाठी डॉ. कमलताई गवई आज दिल्लीला जाणार असून त्यांनी सांगितलं, माझं विमानाचं तिकीट झालं आहे. नागपूरहून काही जुने मित्रही माझ्यासोबत जाणार आहेत.

भूषण गवई हे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीशपदी विराजमान होणारे अनुसूचित जातीतील पहिले न्यायाधीश ठरणार असून, या ऐतिहासिक टप्प्यावर त्यांच्या मातोश्रींनी व्यक्त केलेल्या भावना, केवळ त्यांच्या वैयक्तिक अभिमानाचे प्रतीक नसून, संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी संदेशही आहेत.

### न्यायमूर्ती गवई यांचा कारकीर्दीचा आढावा



न्यायमूर्ती गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्रातील अमरावती येथे झाला. त्यांनी १९८५ मध्ये वकिली सुरू केली आणि २००३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्त झाले. २००५ मध्ये ते कायम न्यायाधीश बनले आणि २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयात नियुक्त झाले . त्यांच्या न्यायालयीन कारकीर्दीत त्यांनी अनेक ऐतिहासिक निर्णय दिले आहेत. त्यात अनुच्छेद ३७० रद्दबातल करण्याचा निर्णय, निवडणूक बांड योजना असंवैधानिक ठरविणे, २०१६ मधील नोटाबंदीला वैध ठरविणे, आणि अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणास मान्यता देणे यांचा समावेश आहे .

**कार्यकाळ आणि पुढील वाटचाल**– न्यायमूर्ती गवई यांचा सरन्यायाधीश म्हणून कार्यकाळ २४ नोव्हेंबर २०२५ रोजी संपेल, जेव्हा ते ६५ वर्षांचे होतील त्यांच्या नेतृत्वात भारतीय न्यायव्यवस्थेतील सामाजिक समावेश, संविधानाचे संरक्षण, आणि न्यायालयीन स्वातंत्र्य यांना अधिक बळकटी मिळण्याची अपेक्षा आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे न्यायव्यवस्थेतील विविधतेला चालना मिळेल आणि संविधानाच्या मूल्यांची अधिक दृढता होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# १७० रुपयांत एक जोडी बूट; दोन जोडी पायमोजे कसे मिळणार ?

## पालकांसह शाळा समितीचा सवाल : ६२ हजार विद्यार्थ्यांचा एकच गणवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**– केंद्र सरकारच्या समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत मोफत गणवेश योजनेच्या अंमलबजावणीसाठी ६ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार इयत्ता १ ली ते ८ वीपर्यंतच्या सर्व मुली, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती मुले, तसेच दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांना एक जोडी बूट आणि दोन जोडी पायमोजे देण्याचे ठरविण्यात आले आहे. मात्र, या योजनेसाठी विद्यार्थ्यांना केवळ १७० रुपये देण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. ज्यामुळे या किमतीत गुणवत्तापूर्ण बूट आणि पायमोजे देणे कसे शक्य होणार, असा सवाल शिक्षकांकडून उपस्थित होत आहे.

राज्यात 'एक राज्य, एक गणवेश' योजना सुरू करण्यात आली असली तरी अंमलबजावणीतील त्रुटींमुळे ती अपेक्षित यश मिळवू शकली नाही. यानंतर आता शाळा व्यवस्थापन समित्यांवर मोफत गणवेश योजनेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. थेट लाभार्थी योजनेंतर्गत शाळा समित्यांना निधी दिला जाणार असून, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्राच्या पहिल्याच दिवशी योग्य मापाचे गणवेश वितरित करण्याचे उद्दिष्ट आहे. स्थानिक स्तरावर गणवेश तयार होत असल्याने ते वेळेत उपलब्ध होणार आहे.



**जबाबदारी आहे शाळा व्यवस्थापन समित्यांकडे**

राज्यात गणवेश योजनेची अंमलबजावणी २०२५–२०२६ या वर्षासाठी सुरू झाली. शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात एक नियमित स्वरूपाचा गणवेश, तर स्काऊट व गाइड या विषयासाठी दुसरा गणवेश आहे. गणवेश तयार करण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समित्यांवर सोपविण्यात आली आहे.

**थेट शाळा व्यवस्थापन समित्यांना निधी**–मोफत गणवेश योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समित्यांकडे देण्यात आली आहे.

### खोट्या पीक कापणी व आणेवारी प्रकरणी

# प्रहारचे जिल्हाधिकारी कार्यालयात मुक्काम आंदोलन

### लवकरच 'प्रहार स्टाईल'ने आंदोलनाचा इशारा



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१३अमरावती : –** खोटा पीक कापणी प्रयोग दाखवून खोटी आणेवारी लावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी करत प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात मुक्काम आंदोलन सुरू केलं. याआधी दि. १९ फेब्रुवारी २०२५ पासून भातकुली तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी आमरण उपोषण केलं होतं. उपोषणावेळी पालकमंत्र्यांच्या निर्देशानंतर जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्या उपस्थितीत लेखी आश्वासन देण्यात आलं होतं. मात्र अद्यापही जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्याने शेतकऱ्यांत तीव्र संताप आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, खोटी आणेवारी तयार करणाऱ्या तिन्ही विभागांनी आपली जबाबदारी झटकत कोणतीही ठोस कार्यवाही केली नाही. त्यामुळे अखेर प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात मुक्काम ठोकत कार्यकर्त्यांनी झुणका–भाकर खाऊन आंदोलनाला सुरुवात केली. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, मागण्या पूर्ण न झाल्यास आणि दोषींवर कारवाई न झाल्यास लवकरच 'प्रहार स्टाईल' मध्ये तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा हि यावेळी देण्यात आला.





